# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

## हिमोग्लोबीन, सिकलसेल तपासणी शिबिर
## दिनांक २० सप्टेंबर, २०१९

राष्ट्रीय सेवा योजना व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजी प्राचार्य, डॉ. केशवराव फाले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात हिमोग्लोबीन व सिकलसेल तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. भास्करराव कुटे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरी अरब यांनी केले. यावेळी त्यांची चमू श्री. काळे साहेब (Supervisor)] विप्लव मुजमुले, मयुर माटे व मयुरी पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी विशेषत: मुलींची हिमोग्लोबीन(CBC) व सिकलसेल तपासणी करण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील एकूण ९७ विद्यार्थीनी व ७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण १०४ सदस्यांची तपासणी, शिबिराच्या माध्यमातून करण्यात आली. या शिबिराचे यशस्वी आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नंदकुमार भाकरे सहकार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश तेलगोटे, महिला तक्रार निवारण समिती प्रमुख प्रा. डॉ. सुजाता नाईक, डॉ. दिपक कुटे, प्रा. डॉ. विकास निंघोट, डॉ. रमेश खंडारे यांनी केले. या शिबिराकरिता विद्यार्थीनींचा उदंड प्रतिसाद लाभला.





